**खडकी लघु पाटबंधारे योजना**
**ता. मालेगाव जि. वाशिम**
**योजनेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: २८० विपाविम/कातां ७(१)/ (धा.क्र १७/२०१८)/ खडकी लपायो / द्वितीय सुप्रमा / २०१९, दि. ११/०९/२०१९**

**पहावे:-**
१. महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/ कातां ७/२३७/ खडकी /प्रमा/(९५/२००८)/२००९, दि. ११.६.२००९
२. शासन निर्णय क्र. ल पा यो २०१३/(११०/२०१३)/ लपा २, दि. १५.२.२०१४.
३. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
४. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ खडकी लपायो /(धा.क्र.३२/२०१८) /३०६/२०१९, दि. १४.३.२०१९
५. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.२०.७.२०१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(१८३/२०१९)/लपा, दि. २७.८.२०१९
६. विपाविम नियामक मंडळाचे दि. २४.०७.२०१९ रोजी संपन्न ७५ व्या बैठकीतील ठराव क्र. ७५/२३

**प्रस्तावाना :**

खडकी लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प या महामंडळांतर्गत तापी खो-यातील काटेपूर्णा उपखो-यात वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील खडकी गावाजवळ स्थानिक नाल्यावर बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील चार गावातील ३५२ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प सिंचन अनुशेष असलेल्या वाशिम जिल्ह्यातील आहे.

खडकी लघु पाटबंधारे योजनेस संदर्भ क्र. १ नुसार सन २००८-०९ चे दरसुचीवर आधारीत रू. ७५१.०० लक्ष (रू. सात कोटी, एक्कावन लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. योजनेस संदर्भ क्र. २ नुसार सन २०११-१२ चे दरसुचीवर आधारीत रू. १३१५.०० लक्ष (रू. तेरा कोटी, पंधरा लक्ष फक्त) इतक्या रकमेस प्रथम प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, भूसंपादन खर्चातील वाढ, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व सदर प्रकल्प मा. राज्यपाल महोदयांच्या अनुशेष निर्मुलन कार्यक्रमातंर्गत समाविष्ट असल्याने द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

खडकी लघु पाटबंधारे योजनेचा द्वितीय सुप्रमा बाबत महामंडळस्तरावर तयार केलेल्या छाननी अहवालाचा मुल्यार्पण अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. १७.१.२०१९ रोजीच्या १२५ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ४ नुसार प्राप्त झालेला आहे.

खडकी लघु पाटबंधारे योजनेच्या द्वितीय सुप्रमा प्रस्तावावर दि.२०.७.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. २४.७.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७५ व्या बैठकीतील ठराव क्र. ७५/२३ नुसार खडकी लघु पाटबंधारे योजनेच्या रू. १७४१.०० लक्ष अंदाजित किंमतीच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रथम प्रशासकीय मान्यता किंमत रू. १३१५.०० लक्ष च्या तुलनेत द्वितीय सुप्रमा प्रस्तावानुसार प्रकल्पाची किंमत रू. ४२६.०० लक्षाने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू लक्ष | मंजुर प्रथम सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे वाढ | २३.०० | १.७५ % |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | १८७.०० | १४.२२ % |
| ३ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | २३२.०० | १७.६४ % |
| ४ | अनुषंगीक खर्च बचत | (-)१६.०० | (-)१.२२ % |
| | एकूण | **४२६.००** | **३२.३९ %** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील खडकी लघु पाटबंधारे योजना, ता. मालेगाव जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. १७४१.०० लक्ष (रू. सतरा कोटी एक्केचाळीस लक्ष फक्त) किंमतीस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. १६९८.०० लक्ष (रू. सोळा कोटी अठ्ठ्याण्णव लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. ४३.०० लक्ष (रू. त्रेचाळीस लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदीचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

१. ठळक बाबी –

**अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** - **३५२ हेक्टर**

**ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** - **२.२९७ द.ल.घ.मी. (२२९७.० स.घ.मी.)**

**क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** - **रू.७५७९४/- (मापदंड रू.१२२१३२ /- प्रती स.घ.मी.)**

**ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** - **१.७३ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)**

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली द्वितीय प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता ( १४/२०१९) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे. वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मुल्यार्पण अहवालात नमुद मुद्दा क्र. १ ते ६ चे अनुपालन करण्यात यावे.

४.७) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.८) प्रकल्प डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करावा.

४.९) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे.

५: सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

६. सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

प्रत सहपत्रासह,

१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.-३२
२. प्रधान सचिव (जसं प्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय-१२) मंत्रालय, मुंबई -३२
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई -३२
८. आयुक्त, अमरावती प्रदेश, अमरावती.
९. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, वाशिम.
१२. अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम.
१३. कार्यकारी अभियंता, वाशिम पाटबंधारे विभाग (बांधकाम), वाशिम.
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती१५. कातां ७(१), संग्रहार्थ.
१६. चित्र शाखा, संग्रहार्थ.

**खडकी लघु पाटबंधारे योजना ता. मालेगाव जि. वाशिम योजनेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

**महामंडळाचा निर्णय क्रमांक :**

२८० /विपाविम/कातां.७(१)/ (धा. क्र.१७/२०१८)/ खडकी लपायो / द्वितीय सुप्रमा-/२०१९,

दिनांक :११/११ चे सहपत्र

**परिशिष्ट-१**

**खडकी लघु पाटबंधारे योजना**

**ता. मालेगाव जि. वाशिम**

**उपशिर्षवार तरतूदींचा गोषवारा**

**किंमत रु. लक्ष**

| अ. क्र. | उपशीर्ष | शिर्ष कामे | मुख्य कालवा | द्वितीय सुप्रमानुसार एकूण तरतूद (दरसूची १६-१७) |
|---|---|---|---|---|
| १. | अ- प्राथमिक | ४.०० | ४.०० | ८.०० |
| २. | ब-भूसंपादन | ६२८.०० | २२३.०० | ८५१.०० |
| ३. | सी --कामे | ५१७.०० | ०.०० | ५१७.०० |
| ४. | डी-विमोचक | १४.०० | १५.०० | २९.०० |
| ५ | ई- प्रपात | ०.०० | ४७.०० | ४७.०० |
| ६ | के-इमारती | १.०० | ०.०० | १.०० |
| ७ | एफ. आर. एच कामे | ०.०० | ५९.०० | ५९.०० |
| ८ | जी-रस्त्यावरील पूल | ०.०० | ७६.०० | ७६.०० |
| ९ | एच-निर्गमन | ०.०० | २.०० | २.०० |
| १० | एल-मातीकाम | ०.०० | ४६.०० | ४६.०० |
| ११ | एम. वनीकरण | ०.०० | ०.५० | ०.५० |
| १२ | ओ-संकिर्ण | ०.०० | ०.५० | ०.५० |
| १३ | पी- व्यवस्थापन | ३.०० | १.०० | ४.०० |
| १४ | आर- दळणवळण | ५१.०० | १.०० | ५२.०० |
| १५ | यु-वितरीका | ०.०० | ३.०० | ३.०० |
| १६ | व्हि.डब्ल्यु. वितरण प्रणाली | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १७ | एक्स -पर्यावरण | १.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **१२२०.००** | **४७८.००** | **१६९८.००** |
| | **अनुषंगीक खर्च** | | | **४३.००** |
| | **एकूण किंमत** | | | **१७४१.००** |

**"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"**

**अधीक्षक अभियंता**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
**नागपूर**

K:\7\e\KT 7(1)\WIC Folder 2019\9-Sep 19\RAA Final Given Orders\RAA Draft order Khadki (sto) MIS 3.9.2019.doc